**परिपत्रक क्रमांक 256**

**विषय :- धर्मादाय संघटनेतील अधिकारी वर्गाच्या दौऱ्याच्या कार्यक्रमाबाबत .**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र आ/10429 दिनांक 4/5/1982**
**आ/27897 दिनांक 2/8/1984**
**आ/4911 दिनांक 18/2/1985**

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, धर्मादाय संघटनेतील अधिकाऱ्यांचे दौऱ्याचे कार्यक्रम, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत शासनाकडे सादर करावयाचे असतात. परस्पर शासनांस सादर करु नयेत, परंतू असे निदर्शनासं आले आहे की, काही अधिकारी हे आपले दौऱ्याचे कार्यक्रम फारच उशीरा पाठवतात. त्यामुळे दौरा सुरु होण्यापूर्वी शासनाकडे पाठविण्यास या कार्यालयांस विलंब होतो. सदर अडचण दूर करण्यासाठी निर्देशित करण्यांत येते की, सर्व अधिकाऱ्यांनी त्यांचा पुढील महिन्याचा दौऱ्याच्या कार्यक्रमाच्या दोन मराठीत प्रती चालू महिन्याच्या 20 तारखेपूर्वी सादर कराव्यात, म्हणजे या कार्यालयांस शासनाकडे सदर दौऱ्याचा कार्यक्रम वेळेंवर पाठविता येईल. तसेच दौऱ्याच्या कार्यक्रमाची एक प्रत जनतेला माहितीसाठी सूचना फलकावर लावावी आणि एक प्रत ज्या धर्मादाय सह आयुक्त यांचे आधिपत्याखाली जे काम करतात त्यांना माहितीसाठी अग्रेषित करावी.

तसेच न्यासांना भेटी दिल्यास अगर न्यासांचे निरीक्षणाकरीता गेल्यास त्यासंबंधी टिपण्णी पाठवावयाची असते. दौऱ्यांच्या वेळी जी प्रकरणे चौकशीकरीता ठेवलेली असतात, त्याची तपशीलवार माहिती जसे कायद्याच्या कोणत्या कलमाखाली किती प्रकरणे इ. माहिती सुध्दा दौरा कार्यक्रमाबरोबर पुरविण्यात यावी.

मा.मु.टुले,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत माहितीसाठी आणि योग्य कार्यवाहीकरीता सर्व विभागीय व उप विभागीय कार्यालयांना.